अनुसूचित जमाती क्षेत्र उप योजनेंतर्गत उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) व्दारे कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्याच्या योजनेसाठी महावितरण कंपनीस सन २०१८-१९ साठी अनुदान वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : निधिवि-२०१९/प्र.क्र.१९/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक -: २५ मार्च, २०१९

<u>वाचा</u> -: १.शासन निर्णय, उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्र. उविप्र- २०१८/प्र.क्र.३०/उर्जा-५ दि.५ मे, २०१८.
२. शासन निर्णय, उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्र. लेखाशि- २०१९/प्र.क्र.१८/उर्जा-५ दि.७ फेब्रुवारी, २०१९
३. शासन परिपत्रक, वित विभाग क्र .अर्थस-२०१८/ प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२ एप्रिल, २०१८
४. शासन परिपत्रक, वित विभाग क्र.पूरक-२०१८/ प्र.क्र.१३५/अर्थ-३, दि.५/१२/२०१८
५. शासन परिपत्रक, वित विभाग क्र.अर्थस-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दि.२५.१.२०१९
६.शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. बीयुडी-२०१८/प्र.क्र.१२/कार्या-६, दि. १६ मार्च, २०१९
७.महावितरण कंपनीचे पत्र क्र. मु.म.व्य/सांघिक वित्त)/१४५३, दि. १४ मार्च, २०१९.

<u>प्रस्तावना-</u>

राज्यातील मार्च, २०१८ अखेर पैसे भरून वीज जोडणीकरिता प्रलंबित असणा-या कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे (HVDS) वीज पुरवठा करणाच्या योजनेस संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेचा लाभ राज्यातील अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील शेतक-यांना होण्याच्या दृष्टीने सदर शेतक-यांच्या कृषीपंपाचे ऊर्जीकरण देखील उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे (HVDS) करणे गरजेचे आहे.

२. अनुसुचित जमाती प्रवर्गातील पैसे भरून प्रलंबित असलेल्या कृषीपंपाचे HVDS प्रणालीवर ऊर्जीकरण करण्यात येणार आहे. राज्यात HVDS योजनेअंतर्गत Partial Turn key अंतर्गत ६३३ कार्यादेश देण्यात आले असून त्यामध्ये १,३०,७४४ कृषीपंपाचा समावेश आहे. तसेच Full Turn Key अंतर्गत १२ कार्यादेश देण्यात आले असून त्यामध्ये ६१,६७१ कृषीपंपाचा समावेश आहे.

३. आदिवासी विकास विभागाच्या उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र.५ अन्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीस विदर्भ व मराठवाडयातील अनुसूचित जमातीच्या वैयक्तिक लाभार्थ्यांच्या कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देण्याकरिता रू. ५९.४३ कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत अनुसूचीत जमातीच्या वैयक्तिक लाभार्थ्यांच्या कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देण्याकरिता रू. ५९.४३ कोटी (अक्षरी रुपये एकोणसाठ कोटी त्रेचाळीस लाख फक्त) इतका निधी, योजनेतील लाभार्थ्यांकरिता अंदाजित रक्कमेच्या मर्यादेत व प्रत्यक्ष खर्च यापैकी कमी रक्कम निर्धारित/परिगणित होईल तितकी रक्कम वापरून प्रत्यक्ष अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांवरच होणारा खर्च विचारात घेऊन उर्वरित निधी परत करण्यात येईल या अटीच्या अधीन राहून महावितरण कंपनीस वितरीत करण्यास या शासन निर्णयाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. या निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या निधीची रक्कम अनुसूचीत जमातीच्या संबंधीत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देणे याकरिता उपयोगात आणण्याची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील.

३. सदर निधी माहे मार्च, २०१९ पर्यंत खर्च होईल याची दक्षता महावितरण कंपनीने घ्यावी. तसेच उपलब्ध करून दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय/उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेली भौतिक उदिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग व उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यन्त पाठविण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

४. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजनाक्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात विविध योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरून शासानाला आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

५. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करून दिलेल्या तरतूदीतून आदिवासी उपयोजना क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबतच्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात.

६. वरील बाबींचा खर्च मागणी क्र.टी-५, मुख्य लेखाशिर्ष २८०१ वीज उप मुख्य लेखाशिर्ष ०५ पारेषण व वितरण गौणशिर्ष ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना गटशिर्ष (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनेअंतर्गत योजना उप गटशिर्ष (०१) (०२) उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे (HVDS) कृषीपंपाचे ऊर्जीकरण करणे (२८०१५५६१) ३१ सहायक अनुदान (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता मंजूर अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

७. सदरची रक्कम अधिदान व लेखा अधिकारी यांच्या मार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव (ऊर्जा-३) व नियंत्रण अधिकारी म्हणून सह सचिव (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी मंजूर झालेली रक्कम रु.५९.४३ कोटी (रुपये एकोणसाठ कोटी त्रेचाळीस लाख फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून महाराष्ट्र राज्य

विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्या नावे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरित करण्याची कार्यवाही करावी.

८. शासन परिपत्रक, वित्त विभाग, दि.०२.०४.२०१८ मधील परिच्छेद-२ ते ९ मधील अटी लागू होत नसल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच परिपत्रकाच्या सोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १ येथील अटीची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच परिशिष्टातील अट क्र. ८ मधील तपासणी सूचीतील अट क्र. १ व ८ ची पूर्तता होत आहे. तपासणी सूचीतील उर्वरीत अटी लागू होत नाहीत. सदर योजना नवीन असल्याने या लेखाशिर्षाअंतर्गत एक वर्षापुर्वीचे संक्षिप्त देयक तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही.

९. सदर शासन निर्णय आदिवासी विकास विभागाचा संदर्भिय शासन निर्णय क्र.५ दि.१६ मार्च, २०१९ अन्वये तसेच सुधारित अंदाजाच्या मर्यादेत आदिवासी विकास विभागाने अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करून दिलेल्या निधीच्या अनुषंगाने प्रशासकीय विभागाच्या अधिकारात वितरीत करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०३२५१६२०३५४०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nitin Gaikwad

Digitally signed by Nitin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5892c3fd8686c1921e784a3faa9888d155b03f5591ce11b21a1b5006247f6972, serialNumber=2276ac762af372d872c2f01d5bb5086166f4a6e20a1bdf9762d556a93f5d118e, cn=Nitin Gaikwad
Date: 2019.03.25 16:24:04 +05'30'

(नितिन गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विदयुत सुत्रधारी कंपनी मर्यादित, हाँगकाँग बिल्डींग,४ था मजला ,एम.जी,रोड . फोर्ट, मुंबई-२
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई-४०००२०.
४) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई-४०००२०.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -२, नागपूर.
६) मा. विरोधी पक्ष नेता,विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ,मुंबई,
७) अधिदान व लेखा अधिकारी, (अराप / रालेवि-१), मुंबई.
८) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
९) कक्ष अधिकारी (रोखशाखा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) उप सचिव, आदिवासी विकास विभाग, कार्या-६, मंत्रालय, मुंबई-३२.
११) उप सचिव (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१३ / साधनसंपत्ती /साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई, ३२
१३) निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.